# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. ५८-६१

(विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन कालावधीतील बैठका)

**दिनांक : ६ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०१५**

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| ५८ | ६ डिसेंबर | रामगिरी निवासस्थान, नागपूर |
| ५९ | १० डिसेंबर | रामगिरी निवासस्थान, नागपूर |
| ६० | १२ डिसेंबर | विधानभवन, नागपूर |
| ६१ | २२ डिसेंबर | विधानभवन, नागपूर |

दि. ६ डिसेंबर, २०१५
महिला व बालविकास विभाग

**माझी कन्या भाग्यश्री योजनेत**
**सुकन्या योजनेचे फायदे समाविष्ट**

सध्या सुरू असलेली सुकन्या योजनेचे फायदे कायमस्वरूपी ठेऊन त्याचा समावेश आता सुरू करण्यात येणाऱ्या माझी कन्या भाग्यश्री योजनेत करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

सुकन्या योजनेसाठी मंत्रिमंडळाने सर्वसाधारण मुलींसाठी ३०३ कोटी रूपयांच्या खर्चास मान्यता दिली आहे. या योजनेचे फायदे कायम ठेऊन माझी कन्या भाग्यश्री या योजनेत अधिकचे सहा लाभ लागू करण्यासाठी दरवर्षी १५३ कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात २५ कोटी रूपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच या योजनेसाठी १८ वर्षापर्यंत एक हजार ५३ कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे.

एका मुलीच्या जन्मानंतर मातेने कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया केल्यास मुलीचा जन्मदिन साजरा करण्यासाठी पाच हजार रूपये पालकांना देण्यात येतील, तसेच मुलीच्या नावावर शासनातर्फे एलआयसीचा २१ हजार २०० रूपयांचा विमा काढण्यात येणार आहे. मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर विम्याची एक लाख रूपयांची रक्कम देण्यात येणार आहे.

एक मुलगी आहे आणि दुसऱ्या मुलीनंतर मातेने कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केल्यास दोन्ही मुलींना या योजनेचे लाभ देण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या मुलीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी दोन हजार ५०० रूपये पालकांना देण्यात येणार आहे. पहिल्या मुलीला पोषण आहाराकरिता एक हजार रूपये तिसऱ्या वर्षापासून देण्यात येणार आहे. तसेच दोन्ही मुलीच्या नावावर शासनातर्फे एलआयसीचा २१ हजार २०० रूपयांचा विमा काढण्यात येणार आहे. मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर विम्याची एक लाख रूपयांची रक्कम देण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत मुलगी आणि तिची आई यांच्या नावाने संयुक्त बचत खाते उघडण्यात येईल. यामध्ये एक लाख रूपयांचा अपघात विमा आणि पाच हजार रूपयांपर्यंत ओव्हर ड्राफ्टचा लाभ घेता येणार आहे. तसेच  आयुर्विमा महामंडळामार्फत राबविल्या जाणाऱ्या केंद्र शासनाच्या आम आदमी योजनेंतर्गत मुलींच्या नावे जमा केलेल्या रक्कमेतून १०० रूपये प्रतिवर्षी इतका हप्ता जमा करून मुलीच्या कमवित्या पालकांचा विमा काढण्यात येणार आहे. यामध्ये मुलीच्या पालकांचा नैसर्गिकरित्या मृत्यू झाल्यास ३० हजार रूपये, अपघातामुळे मृत्यू झाल्यास ७५ हजार रूपये, दोन डोळे आणि दोन अवयव निकामी झाल्यास ७५ हजार रूपये, अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी झाल्यास ३७ हजार ५०० रूपये लाभ मिळणार आहे.

मुलगी पाच वर्षांची होईपर्यंत तिला दर्जेदार पोषण दिले जाणार असून त्यासाठी एका मुलीवर शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबाला दोन हजार रूपयांप्रमाणे पाच वर्षासाठी एकूण दहा हजार रूपये तर दोन मुलींवर शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबातील दोन्ही मुलींसाठी दोन हजार रूपयांप्रमाणे पाच वर्षासाठी दहा हजार रूपये प्रत्येक वर्षाच्या शेवटी मिळतील.

मुलीला प्राथमिक शाळेत प्रवेश घेतल्यानंतर (पहिली ते पाचवीपर्यंत) गुणवत्तापूर्वक पोषण आहार व इतर खर्चासाठी एका मुलीवर शस्त्रक्रिया केलेल्यांसाठी दोन हजार ५०० रूपये पाच वर्षांसाठी १२ हजार ५०० तर दोन मुलींनंतर शस्त्रक्रिया केलेल्यांसाठी प्रती वर्षी तीन हजार रूपयांप्रमाणे पाच वर्षांसाठी १५ हजार रूपये देण्यात येणार आहे. ही रक्कम शाळेकडून उपस्थिती प्रमाणपत्राच्या आधारे दरवर्षी देण्यात येईल. याच कारणासाठी मुलगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत (सहावी ते बारावी) गेल्यानंतर एक मुलीवर शस्त्रक्रिया केलेल्या कुटुंबासाठी प्रती वर्षी तीन हजार रूपयांप्रमाणे सात वर्षांसाठी २१ हजार रूपये तर दोन मुलीनंतर शस्त्रक्रिया केलेल्यांसाठी दोन्ही मुलींसाठी प्रती वर्षी चार हजार रूपयांप्रमाणे २२ हजार रूपये देण्यात येतील.

मुलीला १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर कौशल्य विकास व उच्च शिक्षणाकरिता एलआयसी कडून एक लाख रूपये विम्याची रक्कम मिळेल. यासाठी मुलगी अविवाहित असणे गरजेचे आहे. तसेच विम्याच्या रकमेपैकी दहा हजार रूपये कौशल्य विकासावर खर्च करणे बंधनकारक राहिल.

बऱ्याचशा कुटुंबामधील सासू-सासऱ्यांकडून मुलगाच पाहिजे यासाठी दबाव टाकला जातो. त्यासाठी मुलीस जन्म देणाऱ्या मातेच्या सासू सासऱ्यांना पाच हजारापर्यंत सोन्याचे नाणे व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. त्यामुळे एकाच मुलीनंतर कुटुंबनियोजनास सासू-सासऱ्यांकडून प्रोत्साहन मिळेल.

मुला-मुलींचे लिंग गुणोत्तर एक हजारापेक्षा जास्त असेल, अशा गावांना महिला व बालविकास मंत्र्यांमार्फत पाच लाखांचे पारितोषिक दिले जाईल, या पारितोषिकामुळे कुटुंबामध्ये मुलीचा जन्म व्हावा, यासाठी गावाकडून प्रोत्साहन दिले जाईल. पारितोषिकाची ही रक्कम गावातील मुलींच्या विकासासाठी खर्च करणे बंधनकारक राहणार आहे.

-----०-----

दि. ६ डिसेंबर, २०१५

सामान्य प्रशासन विभाग

**शिवाजी पार्कवर होणार प्रजासत्ताक दिनाचा सोहळा**

मुंबई येथे होणारा प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय सोहळा दादर येथील शिवाजी पार्क येथे आयोजित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

शिवाजी पार्क येथे घेण्यात येणारा हा सोहळा २०१४ पासून मरिन ड्राईव्ह येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मार्ग येथे आयोजित करण्याचा निर्णय २ जानेवारी २०१४ च्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव २०१६ चा प्रजासत्ताक दिन सोहळा शिवाजी पार्क येथे आयोजित करण्यात येणार आहे.

-----०-----

दि. १० डिसेंबर, २०१५
वन विभाग

नागपूर येथे मुख्यालय

## महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरणाच्या स्थापनेस मान्यता

राज्यातील प्राणी संग्रहालयांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासह त्यांच्या योग्य नियमनासाठी महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण स्थापन करुन त्याचे मुख्यालय नागपूर येथे ठेवण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

राज्यातील विविध प्राणी संग्रहालयांच्या व्यवस्थापनात एकवाक्यता यावी आणि केंद्रीय चिडीयाघर प्राधिकरणाशी प्रभावी समन्वय साधण्यासाठी प्राधिकरण स्थापन्याची घोषणा वित्त व वनमंत्र्यांनी २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला असून प्राधिकरणासाठी आवश्यक १२ पदे समायोजित करण्यात येणार आहेत. राज्यातील सर्व मान्यताप्राप्त प्राणी संग्रहालय, बचाव केंद्र, वन्यप्राणी सफारी आणि वन्यजीव अपंगालय विकास व परिरक्षणाची जबाबदारी या प्राधिकरणावर सोपविण्यात येणार आहे. तसेच शासकीय प्राणी संग्रहालयाचे योग्य विकास व परिरक्षण करुन त्यांना आधुनिक व नमुना प्राणी संग्रहालय म्हणून तयार करणे, प्राणी संग्रहालय विकास आराखड्याप्रमाणे काम करणे, संकटग्रस्त प्राण्यांचे संवर्धन व प्रजनन, वन्यप्राणी स्वास्थ्य व व्यवहार संबंधी संशोधन कार्यक्रमांचे कार्यान्वयन, राज्यातील प्राणी संग्रहालयाकरीता इतर राज्य व विदेशातून विक्री आणि अदलाबदलीद्वारे प्राणी उपलब्ध करुन देणे, वन व वन्यजीव संवर्धन, प्राणी संग्रहालयाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे, जनतेमध्ये वन व वन्यप्राण्यांबाबत आवड निर्माण करण्याकरीता जनजागृती करणे आदी उद्दिष्टांचा प्राधिकरणात समावेश करण्यात आला आहे.

राज्यात वन विभागामार्फत ३ व इतर यंत्रणांमार्फत ११ प्राणी संग्रहालये चालविण्यात येत आहेत. भविष्यात वाघ, बिबट यांच्या सफारी सुरू करण्याचेही प्रस्तावित आहे. त्यामुळे वन्यजीव व्यवस्थापन व संरक्षण, मानव-वन्यजीव संघर्ष घटविणे आणि प्राणी संग्रहालयातील वन्यप्राण्यांचे कल्याण याद्दष्टीने हे प्राधिकरण उपयुक्त ठरणार आहे.

-----o-----

दि. १० डिसेंबर, २०१५
विधी व न्याय विभाग

## कौटुंबिक न्यायालयातील कर्मचाऱ्यांना न्या. शेट्टी आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय

राज्यातील इतर सर्व दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच कौटुंबिक न्यायालयातील कार्यरत व सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांना १ एप्रिल २००३ पासून न्या. शेट्टी आयोगाच्या शिफारशी लागू करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

तसेच या कर्मचाऱ्यांना वेतन व भत्त्यांवरील थकबाकीची रक्कम देण्यासही मान्यता देण्यात आली. राज्यातील जिल्हा व सत्र न्यायालये व त्यांच्या अधिपत्याखालील दिवाणी व फौजदारी न्यायालये, लघुवाद न्यायालये, तसेच मुंबई येथील शहर दिवाणी व सत्र न्यायालये, लघुवाद न्यायालय व मुख्य महानगर दंडाधिकारी व त्यांच्या अधिपत्याखालील महानगर दंडाधिकारी यांची न्यायालये येथील न्यायलयीन कर्मचाऱ्यांना न्या. शेट्टी आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या आहेत. त्याच अनुषंगाने कौटुंबिक न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही या शिफारशी लागू करण्यात आल्या आहेत.

-----o-----

दि.१७ डिसेंबर, २०१५
महसूल विभाग

## महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मध्ये अपील, पुनरीक्षणाच्या तरतुदीमध्ये सुधारणा

राज्यात वाद-विवादामुळे वादात अडकून पडलेल्या जमिनींची प्रकरणे जलद गतीने निकाली काढून या जमिनी विकास प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मध्ये अपील, पुनरीक्षणाच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्यासाठी कलम २५५ आणि २५७ मध्ये दुरूस्ती करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यामुळे वाद-विवादासाठी नागरिकांना द्यावा लागणारा वेळ आणि येणारा खर्च यामध्ये बचत होणार आहे.

कलम २५५ मध्ये सुधारणा केल्यामुळे आता सक्षम महसूल प्राधिकारी यांच्याकडे दाखल केलेले अपील एक वर्षाच्या कालावधीत निकाली काढण्याचे बंधन घालण्यात आले आहे. अपवादात्मक स्थितीत शासनाच्या मान्यतेने हा कालावधी सहा महिने वाढविण्यात येणार आहे. कलम २५७ मध्ये सुधारणा करून कोणत्याही महसुली अथवा भूमी अभिलेख अधिकारी यांना त्यांच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांमुळे आदेशाच्या तारखेपासून पाच वर्षानंतर त्या आदेशाचे पुनरीक्षण करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. या नमूद कालावधीतील पुनरीक्षण अर्ज हा दाखल झाल्यापासून एक वर्षाच्या आत निकाली काढण्यात येईल. अपवादात्मक स्थितीमध्ये सहा महिन्याचा कालावधी वाढवून देण्यात येणार आहे. संबंधित कालावधीत अर्जावर निर्णय घेण्यास कसूर करणारा प्राधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल.

-----o-----

दि. १७ डिसेंबर, २०१५
ग्रामविकास विभाग

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना राबविण्याचा निर्णय

इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना आणि शबरी आवास योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन बेघर कुटुंबांना जागा खरेदीसाठी अर्थसहाय्य देण्यासाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या योजनेंतर्गत जागेची प्रत्यक्ष किंमत व ५० हजार रूपये (केंद्र पुरस्कृत योजनेसाठी राज्य शासनाचे ४० हजार आणि केंद्र शासनाचे १० हजार, तसेच राज्य पुरस्कृत योजनांसाठी राज्य शासनाचे संपूर्ण ५० हजार रूपये) यापेक्षा जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम अर्थसहाय्य किमान ५०० चौरस फुट क्षेत्रफळ प्रति लाभार्थी घरकुल बांधकामास जागा उपलब्ध करून देण्यासाठी मान्यता देण्यात आली.

मोठ्या ग्रामपंचायती तसेच शहराशेजारील ग्रामपंचायतीमध्ये जागेचे जास्त दर आणि जागेची कमी उपलब्धता दोन किंवा तीन लाभार्थ्यांच्या संमतीने ५०० चौरस फुट जागेत स्थानिक प्राधिकरणाच्या बांधकामाच्या नियमावलीनुसार दोन किंवा तीन मजले इमारत बांधण्यासाठी प्रत्येक लाभार्थ्याला ५० हजार रूपये जागा खरेदीसाठी अर्थ सहाय्य देण्यासही मान्यता देण्यात आली.

या योजनेंतर्गत दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन बेघर लाभार्थ्यांना जागा खरेदी करण्यासाठी अनुदान देण्यासाठी सर्वसाधारण प्रवर्गाकरिता ग्रामविकास विभागाच्या नियतव्ययातून, अनुसूचित जाती प्रवर्गाकरिता सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेतून व अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता आदिवासी विकास विभगाच्या जनजाती क्षेत्र उपयोजना व जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजनेंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण योजना जिल्हास्तरावर प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांच्यामार्फत राबविण्यात येते. त्यामुळे या योजनांचे राज्यस्तरावरील संनियंत्रण करण्याकरिता ग्रामविकास विभाग समन्वय विभाग म्हणून काम पाहणार आहे. जागा उपलब्ध करून देण्यासाठी गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येणार आहे.

------o-----

दि. १७ डिसेंबर, २०१५
जलसंपदा विभाग

**पैनगंगा नदीवरील ११ बॅरेजेससाठी ७१६ कोटी रूपये**

पैनगंगा नदीवरील वरूड बॅरेज (ता. रिसोड), तसेच जुमडा, कोकलगाव, अडगाव, गणेशपूर, राजगाव, उकळी, सोनगव्हाण, टनका, ढिल्ली व जयपुर बॅरेज (ता. वाशिम) या ११ बॅरेजेसच्या प्रकल्प अहवालास ७१६ कोटी ४२ लाख रूपये इतक्या किंमतीस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली. या बॅरेजेसमुळे वाशिम जिल्ह्यातील पाच हजार ५५४ हेक्टर आणि हिंगोली जिल्ह्यातील दोन हजार १३६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. या कामाच्या निविदा निश्चितेच्या टप्प्यावर अंदाजपत्रकीय किंमतीचे अद्ययावतीकरण व सुसज्जता अग्रिम याबाबत झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने सुरू करण्यात आलेली विभागीय चौकशी सुरू ठेवण्यात येणार आहे. तसेच सर्व प्रकल्प जून २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----०-----

दि. १७ डिसेंबर, २०१५
उच्च व तंत्रशिक्षण

**कंत्राटी तत्त्वावरील अधिव्याख्यात्यांची सेवा नियमित करण्याचा निर्णय**

शासकीय अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालये आणि शासकीय तंत्रनिकेतन तसेच शासकीय महाविद्यालय, संस्थांमधील कंत्राटी, हंगामी स्वरूपात कार्यरत असलेल्या अधिव्याख्याते, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल, शारीरिक शिक्षण संचालकांच्या सेवा नियमित करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

शासकीय तंत्रनिकेतनधील कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती केलेल्या ९१ अधिव्याख्यात्यांनी त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील निकालानुसार तंत्र शिक्षण संचालनालयातील ८७ आणि उच्च शिक्षण संचालनालयाच्या ४२ अध्यापकांच्या सेवा नियमित करण्यात येणार आहे.

-----०-----

दि. १७ डिसेंबर, २०१५
उच्च व तंत्रशिक्षण

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या मसुद्यास मान्यता**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१५चा मसुद्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१५चा मसूदा विधान मंडळासमोर सादर करण्यास मान्यताही देण्यात आली आहे. विधेयकाच्या प्रारूपामध्ये कायदेशीर निगडीत आवश्यक ते फेरफार करण्यास विधी व न्याय विभागास मुभा देण्यात आली. या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी नव्याने १०६ पदे निर्माण करण्यात येणार आहे. या नवीन पदांसाठी १३ कोटी तसेच महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण आणि विकास आयोगाच्या कार्यासाठी दोन कोटी असे एकूण १५ कोटी खर्चास मान्यता देण्यात आली.

-----०-----